दैनिक
# दिव्य मातृछाया
बुलडाणा

सोमवार, दि. २३ जून २०२५

● वर्ष : चौथे ● अंक : ४४ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 www.matruchhaya.in ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# दूध भेसळ रोखण्यासाठी नवा कायदा

## दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांची माहिती

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**राहाता :** राज्यातील दुग्ध व्यवसायात भेसळीचे प्रमाण वाढत असल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस येत आहे. भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा अस्तित्वात येईल, अशी माहिती दुग्धविकासमंत्री अतुल सावे यांनी दिली. राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूध संघ तसेच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याबाबतची मागणी देखील काही दूध उत्पादकांकडून होत आहे. त्यावर शासन पातळीवर अभ्यास समिती नियुक्त करून सर्वानुमते निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



कोपरगाव येथील गोदावरी खोरे तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आज रविवारी दूध संघाच्या कार्यस्थळावर आयोजित करण्यात आलेल्या गौरवपत्र वितरण सोहळ्यात सावे बोलत होते. संघाचे अध्यक्ष राजेश परजणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे, कैलास तांबे, माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे, नाशिक दुग्ध विभागाचे विभागीय सह. निबंधक सी. एम. बारी, जिल्हा दुग्ध विभागाचे सहायक अभियंता टी. बी. भोजणे, जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, दूध उत्पादक, संघाचे संचालक, कर्मचारी उपस्थित होते.

दुग्ध व्यवसायाने शेतकऱ्यांच्या जीवनात स्थिरता आणली आहे. या व्यवसायाला जे संरक्षण हवे आहे ते अजून मिळत नसल्याच्या व्यावसायिकांच्या तक्रारी आहेत आणि त्या रास्तही आहेत. सहकारी आणि खासगी अशी स्पर्धा निर्माण झाल्याने सहकारी दुग्ध व्यवसायाची गळचेपी झाली आहे, अशी कबुली सावे यांनी दिली.

> **शेती उत्पन्नात वाढ, शेतीतील पिकांची शाश्वती, शेतमालाला हमी भाव व योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी सर्वांनाच सोबत घेऊन शासन स्तरावर योग्य धोरण तयार करण्यात येईल. कृषी क्षेत्राशी संबंधित सर्व प्रकारच्या सेवा शेतकऱ्यांना एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच एक ॲप विकसित करण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टाळण्याबरोबरच वेळेतही बचत होणार आहे. पीक नुकसानीचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पंचनामे करून पीक विम्याच्या अनुषंगाने अडचणी दूर करण्यात येतील.**
>
> — **माणिकराव कोकाटे,** कृषी मंत्री

♦ संघाला सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या, स्वच्छ व उत्तम गुणप्रतीचा दूध पुरवठा करणाऱ्या, सर्वाधिक दर देणाऱ्या दूध संस्थांच्या प्रतिनिधींचा तसेच कृत्रिम गर्भधारणेचे उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या कृत्रिमरेतन तज्ज्ञांचा यावेळी गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अपघातामध्ये मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना विमा रकमेच्या धनादेशाचे वितरणही यावेळी करण्यात आले. प्रास्ताविकात दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी दूथ व्यवसायातील अडचणींबाबत अनेक विषय यावेळी मांडले. यावेळी डॉ. सुजय विखे यांचे भाषण झाले.

## बीडमध्ये तांड्यावर डांबून ठेवलेल्या १५ बालमजुरांची सुटका

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**अहिल्यानगर :** आष्टी (जिल्हा बीड) तालुक्यातील वन क्षेत्रातील एका तांड्यावर मजुरी कामासाठी डांबून ठेवलेल्या १५ लहान मुलांची नगरचे सहायक कामगार आयुक्त, जिल्हा बालकल्याण समिती व स्वयंसेवी संस्थांच्या कृती दलाने आज, शनिवारी मुक्तता केली. या बालकांना बीडच्या बालकल्याण समितीकडे सोपवण्यात आले आहे.

सहायक कामगार आयुक्त आर. एम. भिसले व जिल्हा बालकल्याण समितीच्या सदस्य ॲड. अनुराधा येवले यांनी ही माहिती दिली. सुटका केलेल्यांमध्ये ९ मुली व ६ मुलांचा समावेश आहे. सर्वजण ९ ते १२ वयोगटातील आहेत.

या कारवाईमध्ये सहायक कामगार आयुक्त कार्यालयाचे



संदीप हरमळकर, ललित दाभाडे, उदयकुमार सूर्यवंशी, सौरभ हामंद, समितीच्या सदस्य ॲड. अनुराधा येवले, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ संस्थेचे दिलीप गुंजाळ, शिराज शेख, मंगेश थोरात, संध्या कुलकर्णी, मयूरी वणवे, महापालिकेचे आशिष हंस, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाचे सहायक फौजदार अजय बेरड, जालिंदर माने, अशोक लिपणे, रमाकांत गावडे, महिला पोलीस ज्योती शिंदे, चाइल्ड लाइन संस्थेचे राहुल वैराळ यांनी सहभाग घेतला.

# जालन्यात 'पोकरा'तील गैरप्रकार चौकशीसाठी ३८ पथके दाखल

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**जालना :** जिल्ह्यातील बदनापूर, भोकरदन, जाफराबाद आणि जालना या चार तालुक्यांत 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा' योजनेअंतर्गत शेडनेट गृह उभारणीत झालेल्या गैरप्रकाराच्या तपासणीसाठी बाहेरच्या वरिष्ठ कृषी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील ३८ पथके जालना जिल्ह्यात दाखल झालेली आहेत.

२१ जून रोजी दाखल झालेली ही पथके २८ जून २०२५ पर्यंत तपासणी करून गैरप्रकाराच्या संदर्भातील अहवाल शासनास सादर करणार आहेत. नांदेड, धाराशीव, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि परभणी जिल्ह्यांतील कृषी उपसंचालक त्याचप्रमाणे उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांचा या तपासणी पथकांत समावेश आहे. १५६ गावांतील शेडनेटगृह उभारणीच्या संदर्भातील ही चौकशी आहे.

शेडनेट गृह उभारणीतील तक्रारींच्या अनुषंगाने 'पोकरा'च्या मुंबई कार्यालयातील दक्षता पथकाने यापूर्वी २८ डिसेंबर २०२३ रोजी तपासणी अहवाल सादर केला होता. त्यानंतर या योजनेच्या प्रकल्प संचालकांनी ५ जुलै २०२४ रोजी लेखा परीक्षण अहवाल सादर केला. या योजनेतील वसूलपात्र रक्कम पाहता संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंदविण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी २६ सप्टेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील कृषी सहसंचालकांना दिले होते.




### चौकशीची व्याप्ती वाढणार

♦ शेडनेटगृह उभारणीच्या संदर्भात ३ हजार २५६ प्रकरणांत चार तालुक्यांतील १५६ गावांत चौकशी केली जात आहे. जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांतील जवळपास एक हजार शेडनेटगृहांची चौकशीही पुढील काळात करण्यात येणार आहे. २०२०-२०२१ आणि २०२२-२०२३ या काळातील ही चौकशी आहे. – पी. आर. देशमुख, कृषी सहसंचालक, विभागीय, छत्रपती संभाजीनगर.

### मोठा गैरप्रकार

♦ जिल्ह्यात शेडनेटगृहांना अनुदान वितरित करताना त्याचप्रमाणे गोदामे, शेतमाल संकलन केंद्र, औजार बँक इत्यादींच्या संदर्भात 'पोकरा' योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाला आहे. 'पोकरा'च्या मुंबई कार्यालयातील दक्षता पथकाने काही शेडनेटगृहांच्या केलेल्या तपासणीत ५६ लाख गैरप्रकार आढळून आले आहेत. विभागीय चौकशीनंतर यावर प्रकाश पडेल.

**– सुरेश गवळी, तक्रारदार, जाफराबाद**

# एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत, श्वेतपत्रिका जाहीर होणार

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा सुमारे १० हजार कोटी संचित तोटा आहे. त्याचवेळी सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेपैकी एक हजार कोटी रुपये इतकी रक्कम राज्य सरकारने दिली नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नाही. एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वेळेत मिळण्यासाठी व इतर आर्थिक कामकाजासंदर्भातील एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर होणार आहे. त्यात एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत होण्यासाठी भरीव तरतूद केली जाणार आहे.



एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजनासाठी एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी, असे आदेश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला एप्रिल २०२५ रोजी दिले होते. त्यानंतर दोन महिन्यांनी श्वेतपत्रिका जाहीर केली जाणार आहे.

एसटी महामंडळाचा सुमारे १० हजार कोटी संचित तोटा असल्याने महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकांचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागते. कर्मचाऱ्यांची देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी यासाठी महामंडळाला पैशाची गरज आहे. त्याचबरोबर महामंडळाला इंधन, वस्तु व सेवा पुरविणाऱ्या संस्थांची थकीत देणीही द्यायची आहेत. या सर्व घटकांचा विचार करून सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी एक श्वेतपत्रिका जाहीर केली जाणार आहे.

> **एसटी कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी घेण्यात येणाऱ्या प्रत्येक निर्णयाचे स्वागत आहे. त्यामुळे परिवहन मंत्र्यांचा निर्णय योग्य आहे. परंतु, हा निर्णय तात्पुरता नसावा, कायमस्वरूपी असायला हवा. एसटी अधिकारी, कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह व उपदान रक्कम वेतनातून कपात केली आहे. पण निधी अभावी त्या संबंधित संस्थेकडे जमा करण्यात आलेल्या नाहीत.** – **श्रीरंग बरगे,** सरचिटणीस, महाराष्ट्र एसटी कर्मचारी

# जगभरात ऊस उत्पादनवाढीसाठी 'एआय'चा वापर

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**हिंगोली :** समृद्ध शेती करण्यासाठी मातीपरीक्षण आवश्यक असून, त्याप्रमाणे पीक घेणे सोयीचे होईल. ऊस उत्पादनात वाढ करावयाची असल्यास मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी 'एआय' तंत्रज्ञानाचा आवश्य वापर करावा. जगभरात एआयचे तंत्रज्ञान ऊस उत्पादन वाढीसाठी वापरले जात आहे, अशी माहिती बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राचे एआय विभाग प्रमुख तुषार जाधव यांनी केले.



जाधव पुढे म्हणाले की, शेतात कोणते पीक घेणे योग्य राहिल, हे माती परीक्षणातून कळेल. त्यानुसार पिकाची निवड करता येईल. जगात सर्वत्र ऊस उत्पादक शेतकरी 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी आता मागे न राहता 'एआय' तंत्रज्ञान काय आहे ? याची पूर्ण माहिती घेऊन त्याचा उपयोग करावा. एआय तंत्रज्ञानाचा वापर झाला तर ऊस उत्पादन निश्चितच वाढेल, असे जाधव यांनी शेवटी सांगितले. यावेळी दांडेगावकर यांनी 'एआय' तंत्रज्ञान मदतीचे असल्याचे सांगून शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी, असे आवाहन केले.

♦ वसमत येथे पूर्णा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शनिवारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 'पूर्णा'चे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'एआय' वरआधारित ऊसशेती या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. चर्चासत्रास बारामती येथील कृषी केंद्राचे एआय तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, कार्यकारी संचालक केशव अंकुसकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पावसाची विश्रांती; पेरलेल्या बियाणांचे भवितव्य धोक्यात

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यात सरलेल्या सप्ताहअखेरपर्यंत खरीप क्षेत्रांपैकी ३३.५० टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली होती. मे महिन्यामध्ये झालेला मान्सूनपूर्व पाऊस आणि तज्ज्ञांचा अंदाज यावर विसंबून बळीराजाने पेरणीची गडबड केली; परंतु आता पावसाने प्रदीर्घ विश्रांती घेतल्याने पेरलेल्या बियाणांचे भवितव्य धोक्यात आले आहे. उलट कडक उन्हामुळे उकाडा प्रचंड आहे. जे शेतकरी प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत पेरणीच्या प्रतीक्षेत आहेत, तेच सध्या काहीसे चिंतातूर आहेत.



धूळपेरणी हा एक पारंपरिक प्रकार आहे. दरवर्षीच नियमित व दमदार पावसाला सुरुवात होण्यापूर्वी २५ टक्के पेरणी पूर्ण झालेली असते. परिणामी दुबार पेरणी हा सुद्धा नित्याचा प्रकार होऊन बसला आहे. यंदाचे वर्ष सुद्धा त्याला अपवाद राहिलेले नाही.

यंदा मे महिन्यात मान्सूनपूर्व पाऊस चांगला झाला; परंतु त्यामुळे जमिनीतील उष्णता नष्ट झालेली नव्हती. शिवाय यावर्षी सरासरी पेक्षा अधिक पाऊस असल्याचा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करीत होते. त्यामुळे जून महिन्याच्या २० तारखेपर्यंत ३३.५० टक्के शेतकऱ्यांनी पेरणी पूर्ण केली. नांदेड जिल्ह्यात एकूण पेरणीयोग्य क्षेत्र ७ लाख ६१ हजार ५७४ हेक्टर आहे. पैकी २ लाख ५५ हजार १६४ हेक्टर खरीप हंगामात पेरणी झाली आहे.

नांदेड जिल्ह्यात खरीप हंगामात तृणधान्यांपैकी तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका इत्यादी पिके घेतली जातात. तर तूर, मूग, उडीद व इतर असे कडधान्याचे प्रकार पेरले जातात. उन्हाळी भुईमूग, तीळ, कारळ, सूर्यफूल व सोयाबीन या तेलबियांचे पीक सुद्धा घेतले जाते. सोयाबीन वगळता अन्य गळीत धान्याचे क्षेत्र शेकड्यामध्ये आहे; परंतु सर्वाधिक १ लाख ३७ हजार २७० हेक्टरवर सोयाबीन पेरले गेले. त्यानुसार ३२.८४ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

तृण धान्यापैकी तांदळाची पेरणी (६७ हेक्टर) ७.४६ टक्के झाली. ज्वारी (३१४७ हे.) १३.३ टक्के, बाजरी (१८ हे.) ५०, मका (४६३ हे.) ५३.३४ तर केवळ ७ हेक्टरवर अन्य तृणधान्य पेरले गेले. त्यानुसार २५ टक्के पेरणी झाली आहे. कडधान्यांपैकी तुरीचे खरीप क्षेत्र २० हजार २८८ हेक्टर असून, २८.८९ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. मूग (४६९५ हे.) २१.२, उडीद (३८५८ हे.) १७.१५ तर इतर कडधान्य १३.४६ टक्के पेरले गेले आहे.

तेलबियांना गळीत धान्य म्हणून ओळखले जाते. पैकी सोयाबीनचे एकूण क्षेत्र ४ लाख १८ हजार ४२ हेक्टर आहे. पैकी खरीप हंगामात १ लाख ३७ हजार २७० हेक्टरवर पेरणी झाली असून, त्याची टक्केवारी ३२.८४ टक्के भरते. तीळ (९८ हे.) २५ टक्के, कारळ (६८ हे.) ३०.६३ टक्के पेरणी झाली आहे. उन्हाळी भुईमूग आणि सूर्यफूल ही पिके खरीपात घेतली जात नाहीत. तर इतर गळीत धान्याचे क्षेत्र ५३ हेक्टर असून, ९३ टक्के पेरणी झाली आहे.

## तृण, कडधान्यापेक्षा कापूस, तेलबियांची पेरणी अधिक

### कापसाची पेरणी ४३ टक्के पूर्ण

♦ तुलनेने कमी पाण्याचे पीक म्हणून उंच भागातील शेतकरी कापसाला पसंती देतात. नांदेड जिल्ह्यात कापसाचे एकूण क्षेत्र २ लाख १ हजार ४७१ हेक्टर आहे. पैकी ८५ हजार १११ हेक्टरवर कापसाची पेरणी झाली असून, त्याची टक्केवारी ४२.२५ आहे. एकूण ७ लाख ६१ हजार ५७४ हेक्टर पैकी २ लाख ५५ हजार १६४ हेक्टरवर अर्थात ३३.५० टक्के पेरणी झाली आहे. पण, पाऊस तर गायब आहे. शिवाय कडक ऊन पडल्याने उकाडा जबरदस्त असून, पेरलेले बियाणे करपण्याची भीती निर्माण झाली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## डॉ .आर .एन .लाहोटी सी .बी . एस .ई . शाळा

● दिव्य मातृछाया
● शेख इमरान

**सुलतानपूर :** डॉ. आर. एन. लाहोटी C.B.S.E शाळा, सुलतानपूर येथे 21 जूनला आंतरराष्ट्रीय योग दिन अतिशय उत्साह, शिस्तबद्धता आणि सकारात्मक वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक आणि आत्मिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हे होते.

या दिवशी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, वर्गाचे मोलाचे योगदान लाभले, पालक आणि सामुदायिक सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमात जीव ओतला. शाळेचे अध्यक्ष डॉ. हेमराज लाहोटी सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी आपल्या भाषणात योगाचे जीवनातील महत्त्व पटवून देत, नियमित योगाभ्यासाचे फायदे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. शाळेचे सचिव डॉ. शशिराज लाहोटी सर आणि उपाध्यक्षा डॉ. ज्योती लाहोटी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना नेहमीच योगाभ्यासासाठी प्रेरित केले असून, त्यांच्या मार्गदर्शनाचेही या कार्यक्रमात मोलाचे योगदान लाभले.

प्राचार्य श्री. शेख राशिद सर यांनी योगाचे दैनंदिन जीवनातील स्थान, त्याचे मानसिक शांतीसाठीचे योगदान आणि आरोग्यवर्धक उपयोग यावर सखोल मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये योगाभ्यासाबद्दल नवीन ऊर्जास्रोत निर्माण करणारा ठरला. त्यांनी योग ही एक जीवनशैली म्हणून आत्मसात करण्याचा संकल्प केला.



♦ कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योग सत्राने झाली. विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि मान्यवरांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यामध्ये मन:पूर्वक सहभाग घेतला. या सत्राने उपस्थितांच्या शरीरात ऊर्जा आणि मनात शांतीचा अनुभव दिला.

♦ यानंतर "योग फॉर वेलबीईंग" या विषयावर निबंध लेखन आणि पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता, चिंतनशीलता आणि कलात्मकता यांतून योगाचे महत्त्व प्रभावीपणे व्यक्त केले.

♦ या संपूर्ण उपक्रमांचे कुशल संयोजन शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक श्री. डिगांबर डोळस सर यांनी अतिशय नेटकेपणाने केले. त्यांचे वेळेचे भान, शिस्त आणि समर्पित कार्यामुळे सर्व कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले.

## योगासनांचा आरोग्यावर सकारात्मक प्रभाव: डॉ.नितीन मेहेत्रे

● दिव्य मातृछाया
● विजय जाधव

**देऊळगाव राजा :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगाव राजा येथे आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त महाविद्यालयात व विविध खेड्यामध्ये योगा दिवस साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पांगरी, गिरोली खुर्द व समर्थ कृषी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ.नितीन मेहेत्रे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम एक पृथ्वी, एक आरोग्य याबद्दल माहिती दिली. निरोगी राहण्यासाठी रोजच्या दिनचर्यात थोडासा वेळ आपण आपल्या शरीरासाठी देणे गरजेचे आहे.नियमित व्यायाम व योगासने प्राणायाम यांचा आरोग्यावर चांगला परिणाम होतो करिता प्रत्येकाने योगासने करावी असे सांगितले.

रासयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अश्विनी जाधव यांनी भारतीय प्राचीन संस्कृती आणि परंपरा यामध्ये योग ध्यानधारणा, योगासने व योगसाधना याचे महत्त्व आपल्या दैनंदिन जीवनात नक्कीच समावेश केला पाहिजे, जून महिन्याच्या २१ तारखेला सूर्य आपली स्थिती बदलतो म्हणजेच उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते हा एक नैसर्गिक बदल आहे.

प्रा.योगेश चगदळे यांनी विविध योग आसनांची आणि प्राणायाम माहिती दिली. तसेच प्रा. विकास म्हस्के यांनी लोकांना योगाचा वापर करून अधिक जाणीवपूर्वक करून जगण्यास प्रोत्साहित करावे, जागृत राहावे व निसर्गाचा आदर करावा असे सांगितले. सदर कार्यक्रमास प्रा. उषा जायभाये, प्रा. पवार, प्रा.शेळके, प्रा. सोळंकी, प्रा. नागरे सर्व कर्मचारी ग्रामस्थ, विद्यार्थी प्रतिनिधी, शाळेचे विद्यार्थी तसेच शिक्षक वृंद हजर होते.

♦ जेव्हा सूर्याचे दक्षिणाय सुरू होते तेव्हा सूर्याचा प्रकाश आणि उष्णता कमी होते यामुळे वातावरणात बदल होऊ लागतो यामुळे रोगांचे आणि आजारांचे उगमस्थान असलेले जीव जंतू आपलं काम करायला सुरुवात करतात आणि आजारी पडण्याचे प्रमाण वाढायला सुरुवात होते.

♦ योगासनांचा आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो आपल्या शरीर आणि मनाच्या स्वास्थ्यासाठी योग करणे गरजेचे आहे असे सांगितले.




## शेलूबाजारमध्ये योग दिनाच्या सामूहिक योग सत्रात आमदार शामभाऊ खोडे यांचा प्रत्यक्ष सहभाग ठरला विशेष आकर्षण

● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत



**वाशिम :** ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पूर्वसंध्येला शेलूबाजार येथे भव्य शोभायात्रा आणि सामूहिक योग सत्राचे आयोजन करण्यात आले. योगेश्वर नित्ययोग कक्षाच्या वतीने साई श्रद्धा संस्थान परिसरात झालेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांसह परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात शिवानंद योग भारत परंपरेचे योगप्रसारक अमित योगी (अयोध्या) यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, मी आतापर्यंत २० हजार किलोमीटरचे पायदळ भारतभ्रमण केले आहे. देशभर योग प्रचारासाठी प्रवास केला, मात्र महाराष्ट्रासारखा आध्यात्मिक आणि सुसंस्कृत प्रदेश दुसरा कुठेही आढळला नाही. हे संतांची भूमी आहे, येथे अध्यात्म व संस्कार जपले गेले आहेत आणि भाईचारा जपला गेला आहे."

विशेष बाब म्हणजे या योग सत्रात गोगरी येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. माजी सैनिक विनोद पवार यांनी स्थापन केलेल्या नि:शुल्क अवलिया महाराज युवा भारत अकॅडमीच्या १०० मुला-मुलींनी या योग उपक्रमात अनुशासित व उर्जावान सहभाग नोंदवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल योगेश्वर नित्ययोग कक्षाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या योग जनजागृतीसाठी केलेल्या उपक्रमशीलतेची परिसरात सर्वत्र चर्चा आहे.

♦ या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले आमदार शामभाऊ खोडे यांची उपस्थिती व प्रत्यक्ष योग सत्रातील सहभाग. त्यांच्या सहभागामुळे नागरिकांमध्ये विशेष उत्साह संचारला होता. कार्यक्रमाला भाजप तालुका अध्यक्ष सुदर्शन धोटे, मोहन राऊत, पांडुरंग कोठाळे, विनोद जाधव, पोलीस पाटील मदन जुंगाडे, विनोद पवार, बाबाराव पवार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## बुलडाण्यात 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

### योगाभ्यासामधून शिक्षित, सुसंस्कृत स्वस्थ नागरिक घडवणे काळाची गरज– डॉ . किरण पाटील




● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** "योगाभ्यासाच्या माध्यमातून शिक्षित, सुसंस्कृत व स्वस्थ नागरिक, युवक घडवणे ही आजची गरज आहे," असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात केले.

जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलडाणा येथे शनिवारी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या विशेष योग कार्यक्रमात शहरातील सुमारे २५०० योगप्रेमींना सहभाग नोंदवून निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी राजेंद्र पौळ, अनिल गोडगे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, अप्पर पोलिस अधीक्षक बी.बी. महामुनी, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम.मोहन, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, मुख्याधिकारी गणेश पांडे, राजेंद्र काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

♦ कार्यक्रमाचे आयोजन आयुष मंत्रालय, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, जिल्हा योग संघटना, आरोग्य भारती, क्रीडा भारती, आर्ट ऑफ लिव्हींग, योग विद्याधाम, आरोग्य विभाग, योगांजली योग वर्ग, पतंजली योग समिती, ए.एस.पी.एम.आयुर्वेद महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा जिल्हा एकविध खेळ संघटना, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना, अखिल भारतीय योग शिक्षक महासंघ, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, आरोग्य भारती, क्रीडा भारती, ब्रम्हकुमारीज, योग प्रशिक्षार्थी, जिल्ह्यातील योग संस्था, शाळा-महाविद्यालये व विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमात अंजली परांजपे, प्रशांत लहासे, भूषण मोरे, उर्मिला दीदी, अच्युतराव उबरहंडे, बालयोगी क्षितिज निकम आदींनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. प्राणायाम, कपालभाती, अनुलोम-विलोम व ध्यानसाधना यासारखे योगप्रकार शिस्तबद्धरीत्या घेण्यात आले. यावेळी आयुष मंत्रालय अंतर्गत उपस्थितांना योगा मॅट्स तसेच योगप्रेमींकरिता टि-शर्टचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे शेवटी जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. यावेळी मानसोपचार तज्ज्ञ डॉ लता बाहेकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रभाकर वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता जिल्हा प्रशासन, नगर परिषद प्रशासन, शिक्षण विभाग, क्रीडा विभाग, इत्यादींनी परिश्रम घेतले. अंतिम टप्प्यात सचिन खाकरे व उर्मिला दीदी यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने योग दिन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## योग आणि खेळ हे आनंदी निरोगी जीवनाची द्विसूत्री : आ. सौ. श्वेताताई महाले

### तालुका क्रीडा संकुल येथे बॅडमिंटन कोर्टचे लोकार्पण



● दिव्य मातृछाया
● महेंद्र हिवाळे

**चिखली :** येथे आज संपूर्ण जग भारताने जगाला दाखवलेल्या योगसूत्राचा वापर करून आनंदी व निरोगी आयुष्य जगण्यासाठी प्रयत्नशील असून, योग आणि खेळ हेच निरोगी व आनंदी आयुष्याची द्विसूत्री आहे असे प्रतिपादन आमदार सौ श्वेता ताई महाले पाटील यांनी केले.

जागतिक योग दिनाचा मुहूर्त साधून खेळ व आरोग्याचा मेळ साधणाऱ्या बहुउद्देशीय हॉल (बॅडमिंटन कोर्ट) चे तालुका क्रीडा संकुल चिखली येथे आज आमदार सौ. श्वेताताई महाले यांनी लोकार्पण केले. येथून युवा खेळाडू घडावेत आणि सर्वच खेळांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश ठेवून या हॉलची निर्मिती केली आहे.वास्तू निर्माण होत आहेत आता या वास्तूंचा वापर करून आपल्या तालुक्याचा, जिल्ह्याचा नांवलौकिक राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढवणारे खेळाडू निर्माण व्हायला हवेत. असा आशावाद आ. सौ. श्वेताताई महाले यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी केंद्र शासनाच्या खेलो इंडिया स्पर्धेच्या तिसऱ्या युथ गेम्समध्ये तलवारबाजीत महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या पीयूष संजय कोल्हे याचा आ. सौ. श्वेताताई महाले यांनी सत्कार करत 5 लाख रुपयांचा धनादेश आणि त्याच्या भावी यशस्वी कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

या लोकार्पण सोहळ्यास विद्याधरजी महाले (खासगी सचिव, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), संतोष काकडे तहसीलदार,संग्राम पाटील ठाणेदार, महानकर जिल्हा क्रीडा अधिकारी,पंडितदादा देशमुख माजी भाजपा शहराध्यक्ष, गजानन पोफळे गटविकास अधिकारी, सागर पुरोहित शहराध्यक्ष भाजप उपस्थित होते.

♦ आपल्याकडे युवा प्रतिभावंत खेळाडूंची कमतरता नाही. चिखली व परिसरातील कित्येक खेळाडू राज्य व देशपातळीवर नाव गाजवत आहेत. त्यामुळे खेळ हे एक उत्तम करिअर होऊ शकते याची जाणीव पालकांना होत असून नव्या दमाचे क्रीडापटू घडवण्यासाठी या बहूद्देशीय हॉलचा मोठा उपयोग होईल असा मला विश्वास आहे. असे प्रतिपादन आ. सौ. श्वेताताई महाले यांनी केले.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनात मेहकर येथे योगदिन साजरा



● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर २१ :** आयुष मंत्रालय दिल्ली व तसेच पतंजली योग समिती मेहकर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वतंत्र मैदान नगरपालिका मेहकर येथे ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्राणायाम वर्गाचे आयोजन करण्यात आले.

योगाचार्य डॉ.पुरूषोत्तम रेखाते यांनी योग वर्गाला मार्गदर्शन केले.आधुनिक काळात जगत असताना निरोगी जीवन जगण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनाची सुरुवात योग प्राणायामाने करावी.

मनोकायिक रोग उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदय रोग, ॲसिडिटी, वातरोग, अपचन इत्यादी रोगांना योग प्राणायामाने दुर ठेवता असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाकरिता नगरपालीका मुख्याधिकारी रामराजे कापरे, मेहकर चे ठाणेदार व्यंकटेश आलेवार व नायब तहसिलदार अजय पिपंरकर यांच्या सह बहुसंख्येने शहरातील नागरीकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाकरिता सर्व नगर परिषदचे कर्मचारी, पतंजली योग समिती मेहकर व पत्रकार संतोष मलोसे,रमेश चव्हाण,संतोष पवार यांचे सहकार्य लाभले.

- ♦ कार्यक्रम स्थळी मोठी डिजिटल स्क्रीन बसविण्यात आली होती.
- ♦ आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे आयुष मंत्रालयाद्वारे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे प्रसारण यावेळी दाखविण्यात आले.
- ♦ पंतप्रधान नरेंद्र मोदी, ना.प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांच्या प्रमुख उपस्थितीत हा योग दिन साजरा करण्यात आला.



## सुदृढ आरोग्यासाठी 'योग' ऊपयुक्त- ठाणेदार सुनिल शेळके

● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** सुदृढ आरोग्यासाठी योगाचे अनन्य साधारण महत्व असुन नियमित योगा केल्यास शरीर प्रकृती चांगली राहते असे मत दि.२१ जुन रोजी पार पडलेल्या जागतिक योगदिनाच्या कार्यक्रमप्रसंगी मंगरुळपीर पोलिस स्टेशनचे ठाणेदार सुनिल शेळके यांनी व्यक्त केले.पो.स्टे.मध्ये घेण्यात आलेल्या योगदिनाच्या कार्यक्रमाच्या औचित्याने ते बोलत होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी 'योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ' म्हणजेच एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग ही थीम आहे. प्रत्येक घराघरात योगाचा प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने जिल्ह्यातील विविध ठिकाणी योग शिबिराचे आयोजन करावे व त्यामध्ये सहभागी होऊन योगास चालना मिळेल असे कार्यक्रम राबवणे गरजेचे असल्याचेही ठाणेदार यांनी मत व्यक्त केले आहे.

प्रत्येकाने आपल्या निरोगी शरीरासाठी प्राणायाम व्यायाम करणे आवश्यक आहे ह्याकरिता योगगुरु बाबा रामदेव यांचे माध्यमातून देशभरात योग शिबिरे सुरू आहेत. ते टिव्ही चैनल वर सुद्धा दैनंदिन शिबिराच्या माध्यमातून असतात योगदिनी होणाऱ्या योग साधनेमध्ये सर्वांनी सामील होऊन आपलेही या राष्ट्र कार्यात योगदान द्यावे असेही बोलले. पो.स्टे.मध्ये सर्व पोलिस बांधव कर्मचारी यांनी योगाचे धडे गिरवत योगदिन मोठ्या ऊत्साहात साजरा केला.



- ♦ योगाने केवळ शारीरिक आणि मानसिकच नाही तर आध्यात्मिक लाभही मिळतात असे योगाचे महत्व विषद करावे असे आवाहनही केले.ते म्हणाले की मानवी जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे योग अभ्यासामुळे मानवी जीवनात शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक पातळीवर अनेक सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते.
- ♦ पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी २०१४ मध्ये २१ जून हा दिवस "जागतिक योग दिन" म्हणून साजरा व्हावा हा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेत मांडला त्यांच्या या प्रस्तावाला यश मिळत आज योगाभ्यास आणि त्याचे फायदे जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात २१ जून योग दिन साजरा केला जातो



## लोणार निमा संघटनेच्या वतीने योग दिन उत्साहात साजरा

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार (राहुल सरदार) :** लोणार येथील निमा संघटनेच्या वतीने जागतिक योग दिन योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

जागतिक योग दिनानिमित्त लोणार येथे श्री मंगल कार्यालयात योग शिबिर घेण्यात आले. भगवान धन्वंतरी आणि महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली. लोणार येथील प्रसिद्ध योगशिक्षक श्री विनोद थोरवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी योगासनांचा अभ्यास केला.

इ सी मेंबर डॉ. सोनाली मुंदडा, लोणार निमा सचिव डॉ. अनिता नागरे, निमा कोषाध्यक्ष डॉ. उज्वला काटोले, योगशिक्षक डॉ. कल्पना थोरवे, डॉ. चैताली भंडारी, डॉ. हर्षा बियाणी, अदिती मुंदडा यांचे उपस्थिती होती. डॉ.कल्पना थोरवे यांनी हायपर थायरॉइडिजम आणि हायपोथायरॉइडिजम साठी आवश्यक असणारी असणे आणि प्राणायाम शिकविले. योगा सोबत हेल्दी लेमन टीने कार्यक्रमाची सांगता केली.



## शारीरिक,मानसिक आरोग्यासाठी योग : तहसीलदार भूषण पाटील

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार :** येथे जागतिक योग दिनानिमित्त आज, दि. २१ जून रोजी सकाळी लोणार सरोवराच्या काठावर योग दिनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी तहसीलदार पाटील बोलत होते.

याप्रसंगी माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक अरुण मलिक, श्याम बोरकर, ठाणेदार निमिष मेहेत्रे, मुख्याधिकारी विभा वराडे, सभापती बळीराम मापारी, नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे, नायब तहसीलदार योगेश्वरी परळीकर, मंडळ अधिकारी सानप, लोणार टीमचे संतोष जाधव, प्राचार्य डॉ. राजेंद्र बोरसे, गजानन खरात प्रामुख्याने उपस्थित होते.

तहसीलदार पाटील पुढे म्हणाले की, वैदिक प्राचीन काळापासून योगाला अनन्य साधारण महत्त्व आहे. सध्या दैनंदिन जीवन धावपळीचे झाले आहे. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे फार गरजेचे आहे. शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक विकासासाठी तसेच सर्व अवयव सुदृढ राहण्यासाठी नियमित योग करणे काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. यावेळी प्राध्यापक, डॉक्टर, महसूल कर्मचारी उपस्थित होते.

## महेश विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा



● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर :** स्थानिक महेश विद्या मंदिर मेहकर येथे आज दिनांक 21 जून 2025 ला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगविषयीचे महत्त्व विशद करण्यात आले. संयुक्त राष्ट्र संघाने सन 2015 पासून जगभरात हा दिवस योग दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले.

योगसाधनेचे मूळ उगमस्थान भारत देश आहे आणि ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत योगाचे महत्व पटवून देणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच 21 जून हा उत्तर गोलार्धातील वर्षातील सर्वात मोठा दिवस असतो. तर दक्षिण गोलार्धातील हा दिवस सर्वात लहान असतो. त्यामुळे जगभरातील अनेक भागामध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. परंतु याच दिवशी सूर्याचे दक्षिणायन सुरू होते आणि याच दिवशी सर्वात पहिला योगी म्हणून गणला जाणाऱ्या शंकराने योगविषयीचे ज्ञान जगासमोर आणले. म्हणून 21 जून हा आंतरराष्ट्रीय स्तरावर योग दिन साजरा करण्यात येतो. यावेळी सर्व मुलांचे शारीरिक व्यायाम व उत्तेजक हालचाली आणि योगासने सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांनी केली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुभाष लोहिया, कोषाध्यक्ष उदय सोनी ,सचिव गोपाल मोदाणी , प्राचार्य सौ ज्योती मंत्री , उपप्राचार्य काशिनाथ गायकवाड , त्याचबरोबर शाळेचे क्रीडा शिक्षक सुनील चव्हाण यांनी सर्वांना योग साधनेचे मार्गदर्शन केले .

## श्री सिद्धेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सुलतानपूर येथे जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**योगाचे योगदान, समाजासाठी आरोग्याचा संदेश**



● दिव्य मातृछाया
● शेख इमरान

**सुलतानपूर :** श्री सिद्धेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सुलतानपूर येथे 21 जूनला जागतिक योग दिन अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंतराव देसाई यांची अध्यक्ष म्हणून उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे सचिव माधवराव झोरे, कोषाध्यक्ष वामनराव झोरे, तसेच गावातील ग्रामविकास अधिकारी रिंढे साहेब, सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक पाटील सर, व इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमान डव्हळे सर (योगशिक्षक) यांनी योगाचे आरोग्य, मनःशांती आणि जीवनशैली सुधारण्यातील योगदान यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध योगासने, प्राणायाम व ध्यान याचे प्रात्यक्षिक व महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमामध्ये प्राचार्य. धांडे सर, पर्यवेक्षिका, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सूर्यनमस्कार, योगक्रिया आणि भाषणांनी वातावरणात सकारात्मक उर्जा निर्माण केली.

योग दिनाच्या निमित्ताने, आरोग्यदायी जीवनासाठी 'योग' हा एक प्रभावी उपाय आहे, हे भान विद्यार्थ्यांना आणि उपस्थित सर्वांना मिळाले.

# तुमचा पक्षकार आणि भारतीय मतदार यांचे हित सर्वोच्च - आ. सौ. श्वेताताई महाले

## चिखली येथे वकील संघामार्फत विद्याधर महाले व आमदार सौ. श्वेताताई महाले यांचा सत्कार



**महसुली प्रकरणांची सुनावणी चिखली येथेच होण्यासाठी उपविभागीय अधिकारी 'सिटिंग बेंच' सुरू केल्याबद्दल मानले आभार!**

● दिव्य मातृछाया
● महेंद्र हिवाळे

**चिखली, दि. 22 जून :** चिखली तालुक्यातील नागरिकांच्या न्यायासाठीचा संघर्ष अखेर फळाला आला आहे. गेली अनेक दशके प्रलंबित असलेली चिखली येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयाची 'सीटिंग' मंजूर झाली असून, येत्या २५ जूनपासून महसुली प्रकरणांची सुनावणी चिखली तहसील कार्यालयात होणार आहे.

याऐतिहासिकनिर्णयामागे चिखलीच्यालोकप्रियआमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांचा पाठपुरावा आणि तळमळीची भूमिका मोलाची ठरली आहे.

वकील संघाची मागणी, आमदारांचा तात्काळ पाठपुरावा

चिखली वकील संघाने नागरिकांच्या सोयीसाठी महसुली प्रकरणांची सुनावणी चिखलीतच व्हावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. ही मागणी लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारीने आमदार सौ. श्वेताताई महाले यांनी स्वीकारली व तात्काळ लेखी पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. सदर मागणी योग्य आणि रास्त असल्याचे मान्य करत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केवळ आठ दिवसांत निर्णय घेतला, आणि चिखली येथे उपविभागीय अधिकाऱ्यांची 'सीटिंग' सुरू करण्याचे आदेश दिले.

### वकील संघातर्फे जल्लोष आणि सत्कार समारंभ

- ♦ या ऐतिहासिक निर्णयाबद्दल चिखली वकील संघातर्फे आमदार सौ.श्वेताताई महाले आणि मुख्यमंत्री खाजगी सचिव विद्याधर महाले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाले उपस्थित होते.
- ♦ अँड. सोनाळकर, एड. कस्तुरे, श्रीमती भंडारे, श्रीमती कुटे व श्रीमती पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी भावनिक वातावरणात अँड. कस्तुरे यांनी चिखली येथे स्थायी उपविभागीय अधिकारी कार्यालय व दिवाणी न्यायालय स्थापन व्हावे, अशी मागणीही दोन्ही मान्यवरांकडे केली.
- ♦ उत्तर देताना विद्याधर महाले म्हणाले की, "लोकशाहीची फळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत, यासाठी सरकार सदैव कार्यरत आहे. उपविभागीय अधिकारी सीटिंगमुळे शेकडो नागरिकांचे मानसिक, आर्थिक आणि शारीरिक कष्ट वाचणार आहेत."

### श्वेताताईंचा पुढील ध्यास - चिखली न्यायालयाची आधुनिक इमारत

- ♦ आपल्या भाषणात आमदार श्वेताताई महाले म्हणाल्या, "तुमचा पक्षकार म्हणजे देशाचा मतदार. त्याचे हित जपणे हे माझे कर्तव्य आहे. मागील कार्यकाळात तांत्रिक कारणांमुळे न्यायालयाची इमारत उभी राहू शकली नाही, मात्र आता ५५ कोटी रुपये खर्चाची अत्याधुनिक, लायब्ररीसह सुसज्ज न्यायालयीन इमारत उभारण्याचा मानस आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव देण्यात आला असून, त्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे."
- ♦ कार्यक्रमात अँड. संजीव सदार यांचा वकील सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.
- ♦ यावेळी डॉ. कृष्णकुमार सपकाळ (भाजप अध्यक्ष), सागर पुरोहित (भाजप शहराध्यक्ष), गटविकास अधिकारी गजानन पोफळे, सुहास शेटे (माजी नगराध्यक्ष), अँड. मंगेश व्यवहारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शंतनु बोंद्रे, मनोज दांदडे, अँड. कराडे, एड. गवई व अनेक वकील उपस्थित होते.

---

# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी खास बैठक - महावितरण अधिकाऱ्यांसोबत थेट संवाद

● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर दि.२२ :** मेहकर-लोणार मतदार संघातील शेतकरी व नागरिकांच्या वीजविषयक तक्रारी सोडवण्यासाठी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सोमवार, दि. २३ जून रोजी सकाळी १० वाजता हॉटेल के. व्ही. प्राईड हॉल, मेहकर येथे पार पडणार आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात हे राहणार आहेत.



या बैठकीसाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार असून, शेतकरी व नागरिकांना वीजविषयक समस्या थेट मांडता येणार आहेत.

शेतकरी बांधवांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी आपल्या सर्व तक्रारी दोन प्रतींमध्ये लिहून आणाव्यात. पूर्वी महावितरणकडे दिलेल्या पण अजूनही निकाली न लागलेल्या तक्रारींसोबत पाठपुरावा व अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई अथवा दुर्लक्ष याचे पुरावे देखील सोबत आणावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या बैठकीतून अनेक प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघण्याची शक्यता असून, शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला हक्क मांडावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचारी नाहीत; मोजणीसाठी शेतकऱ्यांची दमछाक – शिवसेना आक्रमक

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

## ८ दिवसांत उपाय न झाल्यास, ताला ठोको आंदोलन अटळ – प्रा. सिध्देश्वर आंधळे



**सिंदखेडराजा :** तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात मोजणीसाठी नेमलेले कर्मचारी इतरत्र डेपुटेशनवर पाठविल्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून अर्ज करूनही जमीन मोजणीची कामे रखडली असून, कार्यालयात सातत्याने संपर्क साधूनही शेतकऱ्यांना केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. यामुळे नाराज झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आता शिवसेना मैदानात उतरली आहे.

या आंदोलनाची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. मोजणीसाठी ऑनलाईन अर्ज करून पैसे भरलेल्या शेतकऱ्यांची सहनशीलता संपत चालली असून, शेतीच्या नियोजनावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

शिवसेनेच्या या निवेदनावर छगनदादा मेहेत्रे, बद्री बोडेखे, म्हसाजी वाघ, उल्हास भुसारे, शिवाजी लहाने, रंजीत मरमट, शिवाजी देशमुख यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली आहे.

तालुका प्रमुख प्रा. सिध्देश्वर गैबी आंधळे यांच्या नेतृत्वाखाली उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा व अधीक्षक, बुलडाणा यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे की, जर आठ दिवसांच्या आत सिंदखेडराजा कार्यालयात मोजणीसाठी कर्मचारी नेमण्यात आले नाहीत, तर भूमी अभिलेख कार्यालयासमोर 'ताला ठोको आंदोलन' छेडले जाईल.

---

# गजानन जायभाये यांचा उत्कृष्ट बिलओ म्हणून दिल्ली येथे सन्मान

## या प्रशिक्षणात महाराष्ट्रातून १३२ निवडणूक अधिकारी सहभागी

● दिव्य मातृछाया
● सुरेश हुसे

**सिंदखेड राजा :** तालुक्यातील सेलू येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बिलओ गजानन सटवाजी जायभाये यांचा नवी दिल्ली येथे 'उत्कृष्ट बीएलओ' म्हणून विशेष गौरव करण्यात आला आहे.

१२ व १३ जून २०२५ रोजी भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था (IIIDEM), नवी दिल्ली येथे भारत निवडणूक आयोगातर्फे महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.




या प्रशिक्षणात महाराष्ट्रातून १३२ निवडणूक अधिकारी सहभागी झाले होते. बुलडाणा जिल्ह्यातील २४-सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना जायभाये यांनी बिलओ मोबाईल ॲप अधिक उपयुक्त आणि सुलभ कसे करावे, तसेच दुबार मतदार नोंदणी थांबवण्यासाठी कोणते उपाय अवलंबावेत, यासंदर्भात अत्यंत प्रभावी सूचना मांडल्या.

या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते त्यांना विशेष प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी स्थानिक अधिकाऱ्यांचे योगदान किती मोलाचे ठरू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.जायभाये यांचे हे यश इतर बीएलओ आणि शिक्षकांना प्रेरणा देणारे ठरत आहे.

- ♦ प्रशिक्षण सत्रात मुर्तीजापूरचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी मास्टर ट्रेनर म्हणून मार्गदर्शन केले.
- ♦ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत निवडणूक आयोगाचे निवडणूक आयुक्त डॉ. विवेक जोशी हे उपस्थित होते.
- ♦ गजानन जायभाये यांच्या कार्यामुळे सिंदखेड राजा मतदारसंघासह संपूर्ण बुलडाणा जिल्ह्याचा गौरव वाढला असून, शिक्षक म्हणून त्यांच्या कार्यकौशल्याचा निवडणूक प्रक्रियेतही आदर्श ठरणारा उपयोग झाल्याची भावना विविध स्तरातून व्यक्त होत आहे.

# स्थानीक गुन्हे शाखेची धमाकेदार कारवाई

## जुगार अड्ड्यावर छापा, १ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त, ११ जण अटकेत



● दिव्य मातृछाया
● अफरोज पठाण

**किनगाव राजा :** सिंदखेड राजा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चिंचोली गांवाच्या फाट्याजवळ असलेल्या शिवराज बारच्या भिंतीच्या आडोश्याला सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून १ लाख ४४ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ११ जणांवर घटना स्थळावरून अटक करण्यात आली असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी, स्थानिक गुन्हे शाखेची पी.आय अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय मातोंडकर, पोलीस कर्मचारी दिगंबर कपाटे, दिपक वायाळ, मंगेश सनगाळे, ऋषिकेश थुट्टे, हर्षल जाधव, वनिता शिंगणे, समाधान टेकाळे यांनी केली आहे.

- ♦ चिंचोली फाट्याजवळ जुगार सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला अड्ड्याविषयी गोपनीय माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. तालुक्यातील चिंचोली गांवाच्या फाट्याजवळ असलेल्या शिवराज बारच्या भिंतीच्या आडोश्याला जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पथक तयार करून ता.२२ जून रोजी सायंकाळी ५.३० च्या दरम्यान छापा टाकला छाप्यामध्ये स्थानीक गुन्हे शाखेने बावन तास पत्ते, ११ मोबाईल, ४० हजार २५० नगदी यासह इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

# माळेगाव व मोहेगाव येथील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करा : ॲड.जयश्री शेळके

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मोताळा** : तालुक्यातील माळेगाव व मोहेगाव येथील अनेक शेतकरी व आदिवासी कुटुंबांनी सन १९९८ पासून या परिसरात आपले घर उभे करून वास्तव्य सुरू केले आहे.

या कुटुंबांचे जीवन वनाशेजारील या भूभागाशी जोडले गेले असून, उपजीविका, शेती, गुरेपालन व मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी ही जमीनच एकमेव आधार ठरलेली आहे. परंतु वन विभागाच्या वतीने या सर्व शेतकरी व आदिवासी बांधवांच्या घरावर बुलडोजर चालवून त्यांना बेघर करण्यात आले आहे. या सर्वांचे नव्याने पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे.



♦ "अनुसूचित जमाती व पारंपरिक वनवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६" (Forest Rights Act, २००६) नुसार - १३ डिसेंबर २००५ पूर्वीपासून वनजमिनीवर वास्तव्यास असलेल्या व उपजीविकेसाठी ती जमीन वापरणाऱ्या कुटुंबांना त्या जमिनीवर हक्क बहाल करण्यात येऊ शकतो.

♦ अशा हक्कांचे संरक्षण करण्यात आले असून, कोणतेही पुनर्वसन न देता कुटुंबांना विस्थापित करणे ही मानवी हक्कांची पायमल्ली आहे. या कायद्याअंतर्गत, ग्रामसभेला ही बाब विचारार्थ सादर करून त्यांच्या पुनर्वसनाचा निर्णय घेणे बंधनकारक आहे.

यातील बहुसंख्य नागरिक आदिवासी समाजातील असून ते शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधींपासून आजही दूर आहेत. आपल्या कुटुंबासाठी ते गेली २५ वर्षे संघर्ष करीत आहेत. ही केवळ जमीन नाही, तर त्यांच्या आयुष्याची मुळं या मातीत रुजलेली आहेत. परंतु दुर्दैवाने, कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा आपली बाजू मांडण्याची संधी न देता वनविभागाने त्यांच्या घरांवर १५ मे २०२५ बुलडोझर चालवला आणि त्यांना अक्षरशः उघड्यावर आणून सोडले. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर या सर्व कुटुंबांचा निवारा हिरावून घेतल्याने लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सगळेच सद्या हवालदिल झाले आहेत. त्यामुळे त्रस्त होऊन संबंधित बांधव दि.16 जून 2025 पासून बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत आहेत.

वनविभागाने संबंधित गावांमध्ये कारवाई करीत असतांना वरील वनहक्क कायद्यांना न जुमानता सरसकटपणे गावातील अनेक शेतकरी व आदिवासी बांधवांच्या घरांवर व शेतीवर बुलडोजर चालवून या आदिवासी बांधवांना त्यांच्या मुलभूत हक्कांपासून वंचित केले आहे.

या सर्व शेतकरी, आदिवासी बांधवांचे मुलभूत हक्क व अधिकार कायम रहावेत तसेच मानवता व मानवाधिकाराच्या दृष्टीने वनक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या या शेतकरी, आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे.

# आंदोलनाच्या इशाराने खड्डा भरला पण अर्धवटच

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार** : लोणार तालुक्यातील ब्राह्मण चिकना गावाजवळ नागपूर मुंबई नॅशनल हायवे वर चार-पाच महिन्यापासून भला मोठा खड्डा पडला होता त्यामुळे अनेक वाहनाचा अपघात होऊ लागला परिसरातील नागरिकांनी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांना या खड्ड्या विषयी माहिति दिली असता सानप यांनी नॅशनल हायवेचे अभियंता महेश पुनसे यांना याबाबत माहिति दिली.

आज रोजी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी पत्रकार परिषद घेऊन मागणी केली की महेश पुनसे अभियंता यांना वारंवार माहिती देऊन सुद्धा त्यांनी याची दखल घेतली नाही नुसते ठेकेदारावर कारवाई चे पत्र काढले आज पासून खड्ड्यांमध्ये अपघात होऊन जिवीतहानी झाली तर महेश पुनसे यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा आणि त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करावे अशी मागणी सानप यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

या नॅशनल हायवेवर सुलतानपूर पासून ते सिंदखेडराजा पर्यंत अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे ते पण तात्काळ डांबराने बुजवणयाची मागणी सानप यांनी केली.



♦ महेश पुनसे यांनी सुरवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली असता सानप यांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलनाचा इशारा दिला इशारा दिल्यानंतर त्या खड्या मध्ये गिट्टी टाकुन खड्डा बुजवला पण डांबर मिश्रण केले नाही नुसती गिट्टी टाकली त्यामुळे नॅशनल हायवे वरून जाणाऱ्या मोटरसायकल या गिट्टी वरून घसरुण, स्लीप होऊन या ठिकाणी मोटरसायकल वाले घसरून पडत आहे व एसटी बस किंवा ट्रक सह इतर वाहने त्या खड्डयात आदळल्यामुळे बॅलन्स हुकत आहे त्यामुळे मोठ्या वाहनाचाही अपघात होण्याची शक्यता आहे.

# रिंगरोडचा प्रश्न मार्गी लावणार - आ. कुटे

## शेगावातील समस्या व विकासकामांचा घेतला आढावा

● दिव्य मातृछाया
● सागर शिरसाट

**शेगाव** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात होणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास टाळण्यासाठी रिंगरोडचा मार्ग अवलंबून लवकरच रिंगरोडसाठी पाठपुरावा करून हा प्रश्न सोडविणार असल्याचे प्रतिपादन आ. डॉ. संजय कुटे यांनी केले आहे.

शेगाव येथील नगर पालिकेच्या सभागृहांमध्ये २१ जून रोजी पार पडलेल्या आढावा बैठकीत कुटे यांनी शेगाव शहरातील विविध समस्या व विकासात्मक कामांचा आढावा घेतला. नगरपालिकेच्या मुख्याधिकारी डॉ. जयश्री बोराडे काटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत घरकूल योजना, पाणीपुरवठा योजना, भूगोल योजना यासह विविध योजनांचा आढावा घेतला. शेगाव शहराचा सर्वांगीण विकास अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या शहरातील सर्व मार्ग हिरवेगार दिसतील, याशिवाय या शहराला दररोज पाणी मिळेल अशी व्यवस्था कार्यान्वित केली जात असल्याची माहिती आ. डॉ. संजय कुटे यांनी दिली. शहरात साडेपाचशे कोटी रुपयांचा विकास आराखडा अमलात आणल्या गेला. त्यामुळे या शहरातील विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली आहे. राहिलेली कामे व सौंदर्यीकरण नगरपालिका व विविध फंडातून केल्या जात आहे.

शहरात सुरू असलेल्या घरकुलांच्या कामांना गती देण्या संदर्भात सूचना आ. सूचना आ. कुटे यांनी दिल्या. याशिवाय मलनिःसारीकरण भूगटार योजनेच्या कामांमध्ये गती आणण्याचे निर्देश यावेळी दिले. बैठकीनंतर माध्यमांशी बोलतांना कुटे म्हणाले की, शेगाव शहराला केंद्र शासनाने आध्यात्मिक केंद्र म्हणून घोषित केलेले आहे. राज्यात कोठेच नसेल अशी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या शहरासाठी केली जात आहे. येत्या काळामध्ये येथील नागरिकांना दररोज पाणीपुरवठा केल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी माजी नगराध्यक्ष तथा भाजप नेते शरदसेठ अग्रवाल, पुरुषोत्तम शेगोकार, पांडुरंग बुच, शहराध्यक्ष ज्ञानेश्वर साखरे, पवन शर्मा, गजानन जवंजाळ, कमलाकर चव्हाण, अशोक चांडक, राजू अग्रवाल, नितीन शेगोकर, राजू सुरवाडे, यांचेसह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.



♦ शेगाव नगर परिषद अंतर्गत अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक आणि सुसज्ज अशा नवीन अग्निशमन वाहनांचे लोकार्पण यावेळी आ. डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या नव्या वाहनांमुळे शेगाव शहरात आपत्कालीन परिस्थितींना अधिक तत्परतेने आणि प्रभावीपणे सामोरे जाणे शक्य होणार आहे.

# गरिबीतून प्रगतीकडे वाटचाल - शेख मोहम्मद यांची उमरासाठी मक्का-मदिना यात्रेसाठी भावनिक रवानगी

## मो .तौफिक कुरेशी यांच्या निवासस्थानी सन्मान, लोणारकरांकडून शुभेच्छा

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार** : गरिबीतून संघर्ष करत प्रामाणिक मेहनतीच्या बळावर उभारी घेणारे शेख मोहम्मद शेख गफूर, त्यांची पत्नी खातून बी शेख मोहम्मद आणि सुपुत्र शेख रऊफ ऊर्फ लाला हे तिघे जण पवित्र उमरा यात्रेसाठी मक्का-मदिना येथे काल लोणारहून रवाना झाले. एकेकाळी आर्थिकदृष्ट्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढलेले शेख मोहम्मद आज आपल्या कुटुंबासह अल्लाहच्या घरात जायला निघाले, ही गोष्ट लोणार शहरासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

या पवित्र यात्रेच्या निमित्ताने मो. तौफिक कुरेशी (मा.बांधकाम सभापती तथा अध्यक्ष,लोणार तालुका काँग्रेस अल्पसंख्यक ) यांच्या निवासस्थानी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शहरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाल, श्रीफळ, टोपी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आणि अल्लाह त्यांच्या उमरा यात्रेला कबूल करो, अशा शुभेच्छा व दुवा देण्यात आल्या.

या वेळी मा. सरपंच हाजी अब्दुल लतीफ कुरेशी, मो. तौफिक कुरेशी (आयोजक), आसिफ सर, जावेद कुरेशी, शेख करामात शेख गुलाब (मा. नगरसेवक), अज़ीम चौधरी, मेकॅनिक रियाज़ कुरेशी, तौसीफ कुरेशी (शहराध्यक्ष युवक काँग्रेस), शेख महबूब शेख मोहम्मद, सय्यद सलाम सय्यद गनी, शेख रऊफ शेख भूखान, सय्यद अकबर सय्यद बाबा, शेख वजूदिन शेख शमशोदिन, शेख गफ्फार, शहेज़द रफिक कुरेशी, जकवान कुरेशी, व NSUI विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मो. आकिब तौफिक कुरेशी. यांची प्रमुख उपस्थिती होती.



### शेख मोहम्मद यांच्या संघर्षमय जीवनाचा गौरव

♦ शेख मोहम्मद यांचे जीवन म्हणजे गरिबीवर मात करत स्वाभिमानाने जगण्याचा आदर्श. त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. आज ते आणि त्यांचे कुटुंब उमरा यात्रेला निघाले आहेत, ही त्यांच्यासाठीच नव्हे, तर लोणारसारख्या छोट्या शहरातील युवकांसाठीही प्रेरणादायी घटना आहे.

♦ अल्लाह त्यांच्या यात्रेला कुबूल करो, आणि त्यांच्यावर आपली रहमत कायम ठेवो, अशा शुभेच्छांनी त्यांना निरोप देण्यात आला.

♦ इस्लाम धर्मात उमरा ही अत्यंत पुण्यप्रद यात्रा मानली जाते. जरी ती हजसारखी फर्ज नसली, तरी हृदयशुद्धी, नम्रता आणि अल्लाहच्या नजिक जाण्याचा तो एक पवित्र मार्ग आहे. मक्का व मदिनातील दर्शन, काबा शरीफची तवाफ, जमजम पाणी, सफा-मरवा यामधून मुसलमान भाविक आपले अंतःकरण शुद्ध करतात आणि दुवांची मागणी करतात. अल्लाहकडून क्षमा आणि बरकत मिळवण्याची ही एक सुवर्णसंधी मानली जाते आहे.

# मंगरुळपीर येथील शेतकऱ्याच्या मुलाने MHT CET मध्ये मिळवले घवघवीत यश



### वडिलांचा संघर्ष, जफरयाबचे कठोर परिश्रम

♦ ज़फरयाब म्हणतो की त्याचे आईवडील, शिक्षक आणि नातेवाईक त्याच्या यशामागे कारणीभूत आहेत. तो म्हणाला की लिहिण्याचा सराव केल्याने अभ्यास जास्त आठवतो, म्हणून त्याने ही पद्धत स्वीकारली आणि सर्व विषयांवर समान लक्ष दिले. जफरयाबला भविष्यात अभियांत्रिकीची तयारी करून अभियंता व्हायचे आहे.

● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम** : वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील शेतकरी सोहराब आलम खान यांचा मुलगा जफरयाब आलम खान याने महाराष्ट्र तांत्रिक सामाईक प्रवेश परीक्षेत (MHT CET) १०० टक्के गुण मिळवले आहेत.

या परीक्षेचा निकाल काही दिवसांपूर्वी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET) सेलने जाहीर केला. या परीक्षेसाठी राज्यभरातून एकूण ७२५०५२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. MHT CET मध्ये राज्यात अव्वल राहून त्याने आपल्या कुटुंबाला, शाळेला आणि संपूर्ण जिल्ह्याला अभिमान वाटला आहे.

जफरयाबने ९९.९३ गुण मिळवले आहेत, जे त्याच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. जफरयाब आलम खानच्या या महान कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यात आनंदाची लाट पसरली आहे. कुटुंबातील सदस्य, शिक्षक आणि स्थानिक लोक त्याच्या यशाचा अभिमान बाळगत आहेत आणि अभिनंदनाची मालिका सुरूच आहे.

# आज मेहकर येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्राचे भूमिपूजन

## विद्यार्थ्यांना स्कुल बॅग आणि दिव्यांगांना साहित्य वाटप, आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

● दिव्य मातृछाया
● शहर प्रतिनिधी

**मेहकर** : येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्रातील तिसरे आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्राचे भूमिपूजन आणि जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा असलेली स्कुल बॅग, दिव्यांगांना साहित्य वाटप आणि एसबीआय फाउंडेशन अंतर्गत एस बी आय एफ जीवन सुरक्षा आरोग्य तपासणीचे उदघाटन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात 23 जूनला करण्यात आले आहे.

या केंद्राचा पायाभरणी समारंभ केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालय मेहकर येथे होणार आहे त्यानिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी भवन येथे करण्यात आले या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी गुलाबराव खरात मेथियस बेंगस्टन प्रथम सचिव, व्यापार धोरण आणि आर्थिक कार्य, डेन्मार्क एस बीआयचे राजाराम चव्हाण शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा बळीराम मापारी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी जाधव महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळुकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव भागवान सुलताने पाटील शहर प्रमुख जयचंद भाटिया याच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. एस बीआय फाउंडेशन द्वारा एस बी आय एफ जीवतम सुरक्षा अंतर्गत नागरीकांच्या आरोग्य तपासणीचे उद्घाटन मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे . पहिल्या टप्प्यात मेहकर मोताळा चिखली खामगाव जळगाव जामोद या पाच तालुक्यांतील प्रत्येक 5 हजार अशा पंचवीस हजार नागरीकांच्या 17 प्रकारच्या आरोग्य तपासण्या या अंतर्गत करण्यात येणार आहे आणि दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयव वाटप शुभारंभ मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.



♦ केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची जन्मभूमी असलेल्या मेहकर तालुक्यातील मादणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत 23 जून रोजी होणाऱ्या प्रवेशोत्सव सोहळ्याला मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत त्यानंतर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संपूर्ण गणवेश वाटप पुस्तक वाटप आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीच्या मदतीने अवंत फाउंडेशन मार्फत आधुनिक सुविधा असलेल्या स्कूल बॅगचा वाटप शुभारंभ होणार आहे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील 16 हजार विद्यार्थ्यांना ही आधुनिक सुविधा असलेली स्कूल बॅग मोफत देण्यात येणार आहे. आरोग्य संशोधन विभाग, केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालय आणि एडस संशोधन संस्थेअंतर्गत मेहकर येथे 5.6 कोटी रुपयांचे आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्र उभारण्यात येणार आहे.

